


# महापालिकेत भाजपने बहुमताचा आकडा गाठत सत्ता कायम ठेवली

## ▪ सौ.शारदा रणजीत खेडकर महापौर ▪ अमोल सुधाकर गोगे उपमहापौर









▪अकोला,दि.३० (प्रतिनिधी)▪
अकोला महानगरपालिकेच्या महापौर व उपमहापौर पदाच्या निवडणुकीत भाजपने स्पष्ट बहुमत मिळवत सत्ता आपल्या ताब्यात घेतली आहे. भाजप प्रणित शहर सुधार समितीच्या शारदा रणजीत खेडकर यांची अकोला महापालिकेच्या महापौरपदी बहुमताने निवड झाली, तर अमोल सुधाकर गोगे यांची उपमहापौरपदी निवड झाली आहे.
महापौर आणि उपमहापौर दोन्ही पदांसाठी ४५ मते बाजूने, ३२ मते विरोधात पडली. एमआयएम चे ३ नगरसेवक तटस्थ राहिले. या तटस्थ भूमिकेमुळे भाजपला सत्ता मिळवणे सोपे झाले, असा आरोप काँग्रेसकडून करण्यात आला.
निवडणुकीतही शहर सुधार समितीचे उमेदवार अमोल गोगे यांनी ४५ मते मिळवत विजय मिळिवला. आघाडीच्या सुरेखा काळे ३२ यांना मते मिळाली,

### सुरेखा काळे व आझाद खान यांचा पराभव

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे गट) यांच्या उमेदवार सुरेखा काळे यांचा ४५ विरुद्ध ३२ मतांनी पराभव झाला.तर . उपमहापौर पदासाठी यांनी काँग्रेसचे उमेदवार आजाद खान यांचा ४५ विरुद्ध ३२ मतांनी पराभव झाला.
या निवडणुकीत एमआयएम चे नगरसेवक



सीमा अंजुम शेख अनीस (प्रभाग २-अ), मैमूना बी. अब्दुल रशीद (प्रभाग २-क) आणि सैयद रहीम सैयद हाशम (प्रभाग २-ड) यांनी तटस्थ भूमिका घेतली.
निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी पिठासीन अधिकारी म्हणून काम पाहिले. मनपा आयुक्त डॉ. सुनील लहाने यांनी सहायक निवडणूक अधिकारी म्हणून जबाबदारी पार पाडली. यावेळी अतिरिक्त आयुक्त सुमेध अलोने, नगर सचिव अमोल डोईफोडे, गणना अधिकारी विजय पारतवार, दिलीप जाधव व निवडणूक विभाग प्रमुख अनिल बिडवे उपस्थित होते.दरम्यान, अखचखच च्या तटस्थ भूमिकेवरून काँग्रेस नगरसेवक आक्रमक झाले. सभागृहात काँग्रेस व अखचखच च्या नगरसेवकांमध्ये जोरदार वाद झाला. वाद इतका वाढला की नगरसेवक एकमेकांवर धावून गेल्याची चर्चा आहे. यावेळी बांगड्या फेकण्याचा प्रकार घडला असल्याचे सांगण्यात येत आहे. या गोंधळानंतर पोलिसांना हस्तक्षेप करावा लागला, त्यानंतर परिस्थिती नियंत्रणात आली. अखचखच च्या नगरसेवकांनी काँग्रेसकडून धमक्या दिल्याचा आरोप करत बांगड्या फेकण्याच्या प्रकाराचा निषेध केला आहे.

■ दोन्ही पदांसाठी ४५ मते पडली तर ३२ विरोधात
■ AIMIM चे ३ नगरसेवक तटस्थ
■ काँग्रेस-AIMIM नगरसेवकांमध्ये सभागृहातच राडा
■ बांगड्या फेकण्याचा प्रकार; पोलिसांचा हस्तक्षेप

### अपक्ष आशिष पावितत्रकार यांची भूमिका महत्वाची


भाजपची सत्ता येण्यासाठी ऐनवेळी अपक्ष उमेदवार आशिष पावित्रकर यांनी घेतलेली भूमिका महत्वाची ठरली. आशिष पावित्रकार यांना भाजपने उमेदवारी न दिल्याने त्यांनी अपक्ष लढण्याचा निर्णय घेतला होता. आणि भरघोस मतांनी निवडून आले. महापौर निवडीसाठी त्यांनी भाजपला साथ दिली.





## थोडक्यात

### कानशिवनी येथे इंदुरीकर महाराजांचे जाहीर कीर्तन



**अकोला :** महाराष्ट्रातील प्रख्यात कीर्तनकार ह. भ. प. निवृत्ती महाराज इंदुरीकर यांचे जाहीर हरी किर्तन रविवार दि. १ फेब्रुवारी २०२६ रोजी येथून जवळच असलेल्या कानशिवनी येथे आयोजित करण्यात आले आहे. सौ. उषाताई विनायकराव शेळके पब्लिक स्कूल यांचे मार्फत आयोजित हा कार्यक्रम श्री. राधाकृष्ण जिनिंग अँड प्रेसिंग फॅक्टरीचे प्रांगणात सायंकाळी ठीक ५ वाजता सुरू होईल. श्री. इंदुरीकर महाराज यांचे सोबत वारकरी गंधर्व ह. भ. प. ओंकार जगताप महाराज आळंदी, भजन सम्राट ह. भ. प. शिवाजी महाराज बिरादर लातूर, गायन गंधर्व ह. भ. प. किरण महाराज शेटे संगमनेर, मृदंग अलंकार ह. भ. प. संकेत महाराज आरोटे पुणे यांचीही उपस्थिती राहणार आहे. तरी या जाहीर कीर्तनाचा भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन विनायकराव शेळके व राहुल शेळके यांनी केले आहे.

### गाय व गोऱ्याची चोरी

**पातुर :** पोलीस स्टेशन अंतर्गत येत असलेल्या यातील फिर्यादी विठ्ठल बाबुराव बळकर वय २३ वर्षे राहणार जाभरून यांची गाय व गोरा लाल रंगाचा घराच्या अंगणामध्ये बांधलेला होता रात्री एक वाजताच्या च्या सुमारास कोणीतरी अज्ञात चोरट्यांनी चार चाकी वाहनामध्ये जबरीने टाकून नेले असल्याचे दिसले.

## अकोला जिल्ह्यात विविध ठिकाणी कुष्ठरोग दिन साजरा

### 'कुष्ठ मुक्त सुरक्षित महाराष्ट्र' अभियानास सुरुवात

▪अकोला,दि.३० (प्रतिनिधी)▪
संपूर्ण जिल्ह्यात विविध ठिकाणी आज कुष्ठरोग दिन साजरा करण्यात आला. कुष्ठमुक्त सुरक्षित महाराष्ट्र या राज्यस्तरीय अभियानांतर्गत३० जानेवारी ते १३ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत अकोला जिल्ह्यात 'कुसुम' (कुष्ठरोग मुक्त महाराष्ट्र) मोहीम राबविण्यात येणार आहे.
ही मोहीम जिल्हाधिकारी वर्षा मिना व मुख्य कार्यकारी अधिकारी अनिता मेश्राम यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच उपसंचालक आरोग्य सेवा, अकोला मंडळ डॉ. सुशीलकुमार वाकचौरे यांच्या नेतृत्वाखाली राबविण्यात येत आहे. मोहिमेचे नियोजन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बळीराम गाढवे, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. आरती कुलवाल व सहाय्यक संचालक (कुष्ठरोग) डॉ. दिलीप रणमले यांनी केले आहे.या मोहिमेअंतर्गत आरोग्य कर्मचाऱ्यांमार्फत घरोघरी सर्वेक्षण करण्यात येणार असून तपासणीत आढळून येणाऱ्या रुग्णांना मोफत उपचार* दिले जाणार आहेत.
कुष्ठरोग दिनानिमित्त जिल्ह्यात विविध ठिकाणी कार्यक्रमांचे आयोजन करून उपस्थित अधिकारी, पदाधिकारी व नागरिकांना *कुष्ठरोग मुक्तीची प्रतिज्ञा देण्यात आली.मोहिमेची माहिती सर्व सामान्य नागरिकांपर्यंत पोहोचावी यासाठी जनजागृती चित्ररथ* तयार करण्यात आला असून २६ जानेवारी रोजी मान्यवरांच्या हस्ते त्याचे उद्घाटन करण्यात आले. या चित्ररथाच्या माध्यमातून जिल्ह्यातील विविध भागांत जनजागृती करण्यात येणार आहे.
दरम्यान, प्रजासत्ताक दिनानिमित्त उपसंचालक, आरोग्य सेवा, अकोला मंडळ कार्यालय येथे डॉ. सुशीलकुमार वाकचौरे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी सर्व अधिकारी व आरोग्य कर्मचारी उपस्थित होते. सहाय्यक संचालक, आरोग्य सेवा (कुष्ठरोग) डॉ. डी. टी. रणमले यांनी उपस्थितांना कुष्ठरोग मुक्तीची प्रतिज्ञा दिली.



## थकित करापोटी पुर्व झोन येथील मालमत्तावर सीलची कारवाई

▪अकोला,दि.३० (प्रतिनिधी)▪
२९ जानेवारी २०२६ रोजी मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ.सुनिल लहाने यांच्या आदेशान्वये तसेच मनपा अतिरिक्त आयुक्त सुमेध अलोने, उपायुक्त विजय पारतवार आणि सहा.आयुक्त राजेश सरप यांच्या मार्गदर्शनात अकोला महानगरपालिका क्षेत्रातील पुर्व झोन अंतर्गत जठारपेठ येथील वार्ड क्रं. ए - ३ मालमत्ता क्रं. २९८८, मेसर्स पिंपळकर बिल्डर्स तर्फे शैलेश जाधव यांचेकडे २०१४-१५ पासून आज पर्यंतचे एकुण रक्कम रूपये १,४३,४४६/- एवढा मालमत्ता कर थकित असल्याने त्यांच्या मालमत्तावर सील लावण्याची कारवाई करण्यात आली आहे. सदर कारवाईत कर वसुली लिपिक राजेश साळुंखे, संतोष पांडे, दीपराज महल्ले, सुधीर मिसुरकर, सुरक्षा रक्षक संगीता शिंदे आदींची उपस्थिती होती.



## भूमिगत गटार योजनेच्या कामाला वेग; ५३ किलोमीटरचे जाळे पूर्ण

▪अकोला,दि.३० (प्रतिनिधी)▪
शहराच्या स्वच्छतेसाठी आणि नियोजित विकासासाठी मैलापाणी व्यवस्थापन महत्त्वाचे असून, अमृत योजने अंतर्गत राबविण्यात येत असलेल्या १६७४.६५ कोटी रुपयांच्या भूमिगत गटार योजनेच्या कामाला आता गती मिळाली आहे. या प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्यातील पहिल्या भागासाठी ६८३.६८ कोटी रुपये खर्च केले जात असून, आतापर्यंत ५३ किलोमीटर लांबीच्या मलजलवाहिन्यांसह चेंबर आणि इन्स्पेक्शन चेंबर बसविण्याचे काम पूर्ण झाले आहे.यापूर्वी अमृत योजनेच्या पहिल्या टप्यात ७९ कोटी रुपये खर्चून ३० आणि ७ एमएलटी क्षमतेची मलजलशुद्धीकरण केंद्रे उभारण्यात आली आहेत. यामध्ये मोर्णा नदीच्या दोन्ही बाजूने आणि पिकेव्ही परिसरातील नाल्यांवर मलजलवाहिन्या अंथरण्याचे काम पूर्ण झाले आहे.आता दुसऱ्या टप्प्यात प्रामुख्याने शहराच्या हद्दवाढ भागात ही योजना राबविली जात असून, उर्वरित कामे पुढील टप्प्यात पूर्ण केली जाणार आहेत. सद्यस्थितीत जाजू नगर, श्रद्धा नगर, लुम्बिनी नगर, डाबकी आणि परमहंस नगर या भागांत मलजलवाहिनी टाकण्याच्या कामाला प्रारंभ झाला आहे. मध्यंतरी अवकाळी पावसामुळे या कामात अनेकदा व्यत्यय आला होता, मात्र पावसाळ्यानंतर या कामाचा वेग वाढवण्यात आला आहे. या योजनेच्या आराखड्यानुसार, संकलित केलेले सांडपाणी डाबकी रोड रेल्वे जवळील एका १४ मीटर खोल विहिरीत जमा केले जाणार आहे. या विहिरीचे काम सध्या प्रगतीपथावर असून, तेथून हे सांडपाणी पंपिंगद्वारे शिलोडा येथील मलजलशुद्धीकरण केंद्रात प्रक्रियेसाठी पाठवले जाणार आहे.

## एक कदम गांधी के साथ...! सर्वोदयी कार्यकर्त्यांचा संकल्प

### गांधी जवाहर बागेत सूत कताई यज्ञ

▪अकोला,दि.३० (प्रतिनिधी)▪
भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात तसेच राष्ट्राच्या नैतिक जडणघडणीत महात्मा गांधींचे योगदान दीपस्तंभाप्रमाणे उजळून निघाले आहे. सत्य, अहिंसा आणि सर्वोदय विचारांची अखंड ज्योत आजही समाजाला दिशा देत आहे. हा विचार पुढील पिढीपर्यंत पोहोचवण्यासाठी एक कदम गांधी के साथ या उपक्रमाद्वारे ज्या ज्या ठिकाणी गांधीजींचा संचार झाला त्या ठिकाणांना भेटी देत संपर्क संवाद साधण्याचा संकल्प सर्वोदयी कार्यकर्त्यांनी आजच्या सूत कताई यज्ञप्रसंगी केला.
महात्मा गांधी शहीद दिनी गांधी -जवाहर बागेत आयोजित सूत कताई यज्ञ- व्यसनमुक्ती संकल्प सभेच्या अध्यक्षस्थानी सर्वोदय मंडळाचे जिल्हाध्यक्ष बबनराव कानकिरड होते.ज्येष्ठ सर्वोदयी महादेवराव भुईभार, विजय कौसल, डॉ.शि.ना. ठाकूर, कामगार नेते प्रदीप वखारिया, प्रा. विवेक हिवरे, ह.मो.खटोड गुरुजी, माजी उपमहापौर निखिलेश दिवेकर यांची प्रमुख उपस्थिती होती.सर्वप्रथम महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार व मनोविकास प्रकाशनाचे पाटकर यांच्या दुःखद निधनानिमित्त श्रद्धांजली वाहण्यात आली. महात्मा गांधींच्या पुतळ्यासमोर सूतमाला व पुष्पार्पण करून अभिवादन करण्यात आले. महाराष्ट्र नशाबंदी मंडळाचे वतीने व्यसनमुक्ती प्रदर्शनी या ठिकाणी लावण्यात आली होती. अ.भा.सर्व सेवा संघाचे प्रतिनिधी डॉ. शि.ना.ठाकुर यांनी गांधीग्राम येथे आयोजित गंगापूजन कार्यक्रम व जिल्ह्यात राबवायच्या सर्वोदय संवाद कार्यक्रमाची माहिती दिली.
शाकाहारी विचारप्रवर्तक रमेश तोरावत जैन यांनी सुखी निरामय जीवनासाठी शाकाहार कसा उपयुक्त आहे याची माहिती दिली.
राष्ट्रीय एकात्मता व अखंडता अबाधित राखण्यासाठी महात्मा गांधीजींच्या विचाराची आज नितांत गरज असल्याचे प्रतिपादन सर्वोदय मंडळाचे जिल्हाध्यक्ष बबनराव कानकिरड यांनी अध्यक्षीय भाषणातून केले. ज्येष्ठ सर्वोदयी शंकरराव सरप वाडेगांव, कापूस ते कापड अभियान प्रमुख प्रल्हादराव नेमाडे, आत्माराम शेळके, जयकृष्ण वाकोडे, शोभाताई म्हैसने अकोट, प्रा. सुहास उदापूरकर,गणेशराव अढाऊ, महेश आढे, दिलीप साधवानी मानव, हिम्मतराव गावंडे,राष्ट्रीय एकात्मता प्रचारक साहेबराव तायडे यांनी चरख्यावर सूत कताई केली.
प्रा. सुभाष गादिया,डॉ. पूजा रमाकांत खेतान, डॉ. जगदीश चिंचोलकर, साने गुरुजी शिक्षक संघटनेचे ज्ञानेश्वर मांडेकर, माजी प्राचार्य प्रमोद बंड, प्रा.मोहन खडसे, विवेक रमेशराव मेतकर, आकाश सुर्यवंशी, विक्रांत खंडेराव, नंदकिशोर गावंडे,प्रा. दतात्रय भाकरे, अरुण साखरकर, सुरेशचंद्र काळे, रोहित तारकस, रविकांत हुरपडे, वेदश्री तायडे, नितीन भरणे, संतोष भाकरे,प्रा प्रविण वाघमारे, डॉ. रावसाहेब काळे यांनी सूत कताई यज्ञात सहभाग घेतला.





## थोडक्यात

### उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या श्रद्धांजली सभेचे आयोजन

**अकोला :** विमान दुर्घटनेत मृत्यू पावलेले राज्याचे उपमुख्यमंत्री व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष दिवंगत अजितदादा पवार यांच्या श्रद्धांजली सभेचे आयोजन करण्यात आले आहे. अजितदादा पवार यांच्या कर्तृत्वाला अभिवादन करण्यासाठी व दादांच्या प्रेरणादायी वारसा नेतृत्वाला स्मरण करण्यासाठी आज दि ३१ जानेवारी रोजी दुपारी ३ वाजता स्थानिक पोलीस लॉन, जिल्हा परिषद मार्ग येथे श्रद्धांजली सभा आयोजित करण्यात आली आहे. या श्रद्धांजली सभेत दादांचे चाहते, नागरिक, सर्व पक्षाचे नेते व कार्यकर्ते मंडळींनी उपस्थित रहावे असे आवाहनराष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष व माजी महापौर मदन भरगड यांनी केले.

### विद्यार्थी व शिक्षकांच्या समस्या त्वरित सोडवा

**अकोला :** जिल्हा परिषद अकोला अंतर्गत शिक्षक व विद्यार्थी हिताच्या समस्या सोडविण्याबाबत संघटना वतीने शिक्षणाधिकारी प्राथमिक रतनसिंग पवार यांना निवेदन देऊन संघटना पदाधिकारी यांनी सविस्तर चर्चा केली. यामध्ये जि. प. शाळेत दाखल असलेल्या विद्यार्थाच्या आधार कार्डमधील अडचणी येत असल्याने त्या सोडविण्याकरिता जिल्हास्तरावरून शिबिराचे आयोजन करण्यात यावे. असेही निवेदनात म्हटले आहे. विषय शिक्षकांनी केलेल्या विनंतीवरून पदावनत प्रक्रियेकरिता करण्यातयावी. जि.प. मधील अनेकशाळेमध्ये शिक्षकांची पदे रिक्त असल्याने समायोजन प्रक्रिया त्वरित राबविण्यात यावी, आदी मागण्यांचा समावेश आहे.

### बिबट्याचा बछड्यावर हल्ला

**अकोट :** वाघांचा वावर वाढला आहे त्यामुळे शेतकरी शेतमजूर यांच्यामध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.पुनर्वसीत झालेल्या कुंड येथील भुरी मोतीलाल जामुनकर या आदिवासी महिला शेतात ढोरे चारत असताना बिबट्याने अचानक हल्ला करून तीन वर्षाच्या गायीच्या बछड्यावर ताव मारला.

**CHANGE IN NAME**
I Have change my name
Passport no (M3991700)
--From--
**SONABAI TULLE**
--TO--
**SONABAI BHUPENDRASINGH SONEJI**
My Residential Address is Opp Birla gate no 1 Tapdiya Nagar Akola 444005

**CHANGE IN NAME**
I Have Change My Name
-- From --
**KUSHAL PRADEEPKUMAR KESWANI**
--TO--
**KHUSHAL PRADEEP KESWANI**
My Residential Address is -- Primary School Road Sindhi Camp Pakki kholi Akola 444004.

**CHANGE IN NAME**
I Have Change My Name
-- From --
**KUSHAL PRADEEPKUMAR KESWANI**
--TO--
**KHUSHAL PRADEEP KESWANI**
My Residential Address is -- Primary School Road Sindhi Camp Pakki kholi Akola 444004.

# जनतेच्या विश्वासाला तडा जाऊ देणार नाही : आ.रणधीर सावरकर

▪अकोला,दि.३० (प्रतिनिधी)▪

अकोला महानगरीच्या नागरिकांच्या विश्वासाला तडा जाऊ देणार नाही. विकास हे सूत्र कायम लक्षात घेऊन जात-पात धर्म न पाहता शहराचा सर्वांगीण विकास सर्व स्पर्शी विकास हे एकमेव लक्ष घेऊन शहर सुधार आघाडी काम करेल, असा विश्वास आमदार रणधीर सावरकर यांनी व्यक्त केला.

अनेक कार्यकर्ते कमी मताने पराभूत झालेत. त्यांनी हताश न होता सामाजिक उपक्रम राबवून पक्षाचा आणि स्वतःची प्रतिमा उंचावण्याचा काम करावं तसेच पक्ष ही आपली आई आहे, पक्षाची भूमिका तसेच पक्षाने घेतलेला निर्णय याच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहावे. पक्ष हा प्रत्येक कार्यकर्त्यांच्या कामकाजावर लक्ष ठेवत असतो. त्यामुळे कार्यकर्त्यांनी मोठ्या उद्देशाने पक्षाच्या पाठीशी उभे राहावे, अशी विनंती आमदार सावरकर यांनी केली. पक्षाच्या विरोधात काम करणाऱ्यांचा सन्मान केल्या जाणार नाही असेही त्यांनी सांगितले.हा विजय अकोल्यातील जनतेला आणि देवेंद्र फडणवीस यांना समर्पित आहे. अशा शब्दात आपल्या भावना व्यक्त करून कार्यकर्ता हा भारतीय जनता पक्षाचा आत्मा असून अकोलेकर ही आमची ताकद विश्वास आणि राज राजेश्वर नगरीचे प्रेम कायम ठेवून त्यांच्या विश्वासाला सार्थ करण्यासाठी महायुती सरकार कटिबध्द असून शहर सुधार आघाडीच्या माध्यमातून जनतेला दिलेल्या वचनाची पूर्ती करण्यासाठी आम्ही कार्यरत राहू असेही आमदार सावरकर यांनी सांगितले. शारदाताई खेडकर यांची महापौर पदी तर अमोल गोगे यांची उपमहापौर पदी निवड झाल्यानंतर भारतीय जनता पार्टी कार्यालयात कार्यक्रमात ते बोलत होते राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या निधनाने राजकीय दुखवटा असल्यामुळे कोणतीही आतिषबाजी कोणती घोषणाबाजी तसेच हार तुरे न स्वीकारता आनंद व्यक्त करीत हा कार्यक्रम करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी जयंत मसने हे होते तर मंचावर खासदार अनुप धोत्रे, विजय अग्रवाल, संतोष शिवरकर, किशोर पाटील वसंत बाछुका, शारदाताई खेडकर, अमोल गोगे, वैशालीताई शेळके, पूजाताई गावंडे, उषाताई विरक,, पवन महल्ले, कृष्णा शर्मा, माधव मानकर अंबादास उमाळे, आम्रपाली उपरवट, चंदाताई शर्मा, संजय गोटफफोडे, एडवोकेट देवाशिष काकड, विराजमान होते. जय आणि पराजय यापासून भाजपा कार्यकर्ता हतबल होत नसून आत्मचिंतन करून कार्यरत राहावं, समाजसेवा आणि समाजाच्या शेवटच्या घटकाची सेवा करण्यासाठी कटिबद्ध असतो तसेच हा विजय मित्रपक्ष यांच्या सहकार्याने प्राप्त केला आहे हा विजय शहराच्या विकासासाठी असल्याचेही खासदार अनुप धोत्रे यांनी सांगितले यावेळी विजय देशमुख, संग्राम गावंडे, आमदार अमोल मिटकरी, सुनील भाऊ मेश्राम, रफिक सिद्दिकी, उषा विरक यांच्या सहकार्याने हा विजय शहर सुधार आघाडीला मिळाला आहे असे विजय अग्रवाल यांनी सांगून कार्यकर्त्यांच्या बळावर हा विश्वास विजय रथ अविरतपणे सुरू राहिला असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.यावेळी जयंत मसने, किशोर पाटील संतोष शिवरकर यांचे भाषणे झाली. कार्यक्रमाचे संचालन माजी नगरसेवक जिल्हा प्रसिद्धीप्रमुख गिरीश जोशी यांनी



# ग्रामपंचायत अधिकाऱ्यांना मारहाण प्रकरणी संघटनेकडून कारवाईची मागणी

▪मुर्तिजापुर,दि.३० (प्रतिनिधी)▪

येथील अकोली जहागीर ग्रामपंचायतमध्ये २६ जानेवारी २०२६ रोजी प्रजासत्ताक दिनानिमित्त आयोजित ग्रामसभेत ग्रामपंचायत अधिकाऱ्यांना मारहाण व शिवीगाळ झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे. याप्रकरणी महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत अधिकारी संघटनेने (डी एन ई - १३६) दोषींवर कडक कारवाई करण्याची मागणी केली आहे. अकोली जहागीर येथे दुपारी २:०० वाजता ग्राम सभेचे आयोजन करण्यात आले होते.

सभेचे नियमित कामकाज सुरू असताना ग्रामपंचायत अधिकारी लक्ष्मण चुडे यांनी विषय पत्रिकेवरील विषयांचे वाचन केले. मात्र, विषय पत्रिकेवर नसलेल्या विषयांवरून काही ग्राम स्थांनी गोंधळ घालण्यास सुरुवात केली. यावेळी ग्रामपंचायत अधिकाऱ्यांना अश्लील शिवीगाळ करून जीवेमारण्याची धमकी देण्यात आली व त्यांना मारहाण करण्यात आली.या निंदनीय घटनेचा तालुका संघटनेने जाहीर निषेध केला आहे. दोषींवर तातडीने कडक कायदेशीर कारवाई करण्यात यावी, यामागणीचे निवेदन महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत अधिकारी संघटना, तालुका शाखा मूर्तिजापूरच्या वतीने गटविकास अधिकारी (पंचायत समिती) आणि ठाणेदार (माना पोलीस स्टेशन) यांना देण्यात आले.यावेळी संघटनेचे अध्यक्ष देवानंद डोंगरे, सचिव सुनील मानकर, अर्चना कथलकर, सोनल ढाकरे, शीतल उंबरकर, भारती ढुके, अनिल निंबोकार, बाळू भोरकडे, भारत भोरकडे, संदीप हेंगड, प्रतिभा गावंडे, प्रीती भड, संदीप शिरसाट, महेंद्र मुंडे, समीर शर्मा, सतीश भगत उपस्थित होते.



# घरगुती गॅस वाहनासाठी विक्री करणाऱ्यांवर कारवाई; मुद्देमाल जप्त

## पुरवठा कार्यालय व गुन्हे शाखेची संयुक्त कारवाई

▪अकोला,दि.३० (प्रतिनिधी)▪

घरगुती वापराच्या गॅस सिलेंडरचा वापर वाहनांमध्ये होत असल्याचे आढळल्यावरून जिल्हा पुरवठा कार्यालय व जिल्हा गुन्हे शाखेच्या पथकांनी केलेल्या कारवाईत २० हून अधिक सिलेंडर, वजनकाटे, ३ ऑटोरिक्षा वाहने आदी साहित्य जप्त करण्यात आले. ही कारवाई मंगळवारी करण्यात आली.

पातूर रस्त्यावर वाशिम बायपास परिसरात एक व्यक्ती घरगुती वापराचा गॅस वाहनांमध्ये भरून देऊन अवैध विक्री करत असल्याची माहिती मिळाली. त्यावरून अन्नधान्य वितरण अधिकारी रवींद्र येन्नावार, पुरवठा निरीक्षक रामेश्वर भोपळे, योगेश सातव, राष्ट्रपाल वाहूरवाघ, पोलीस कॉन्स्टेबल राजसिंह चंदेल, मोहम्मद आमीर मो. अनिस व पंच यांच्या पथकाने हॉटेल दिल्ली दरबारच्या मागील बाजूच्या परिसरात जाऊन पाहणी केली.

त्याठिकाणी दोन ऑटोरिक्षा दिसून आल्या. एक व्यक्ती घरगुती वापराचे गॅस इंधन टिल्लू मशीनच्या साह्याने रिक्षात भरत असल्याचे आढळले. तिथे तत्काळ कारवाई करून घरगुती वापराचे ८ सिलेंडर, पाच किलो वजनाचे दोन रिकामे सिलेंडर, चार टिल्लू मशीन, दोन वजनकाटे व दोन ऑटोरिक्षा जप्त करण्यात आल्या.दरम्यान, ही कार्यवाही सुरू असताना गॅस सिलेंडरची वाहतूक करणारा एक अॅपे ऑटोरिक्षा येताना दिसून आला. ऑटोचालकास थांबवले असता तो पळून जाऊ लागला. पाठलाग करून पकडण्यात आले. याही वाहनातून घरगुती वापराचे १२ सिलेंडर, १० रिकामे सिलेंडर व एक अॅपे ऑटोरिक्षा असे पावणेतीन लाख रू. किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. घरगुती गॅस इंधनाचा वाहनांत वापर-विक्री केल्याप्रकरणी दोन व्यक्ती व अज्ञात जागामालक यांच्याविरूद्ध जुने शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली.

# रोहनभाऊ भंजकर हा मराठी कष्टकरी माणसाचा बुलंद आवाज!

## एकजुटीने मतदान करा-भैया भाऊ खारोडे यांचे आक्रमक आवाहन

▪तेल्हारा,दि.३० (प्रतिनिधी)▪

बिग बॉस मराठी ६ मध्ये सहभागी झालेला रोहनभाऊ भंजकर हा केवळ स्पर्धक नसून तो मराठी कष्टकरी माणसाचा बुलंद आवाज आहे. त्याच्या विजयासाठी प्रत्येक मराठी माणसाने एकजुटीने उभे राहावे, असे आक्रमक आवाहन छत्रपती शंभूराजे प्रतिष्ठानचे भैया भाऊ खारोडे जि एम फिटनेस सेंटर संचालक योगेशजी पांडे यांनी केले आहे. अत्यंत हालाखीच्या परिस्थितीतून, प्रचंड संघर्ष करत रोहनभाऊ भंजकर यांनी हा प्रवासष गाठला आहे. स्वतःच्या कष्टावर उभा राहिलेला हा युवक आज लाखो गरीब, शेतकरी व कष्टकरी कुटुंबातील तरुणांचे प्रतिनिधित्व करत आहे. अशा व्यक्तीला पाठिंबा देणे ही केवळ मतदानाची बाब नसून ती मराठी स्वाभिमानाची लढाई असल्याचे खारोडे यांनी ठामपणे सांगितले.आज जर मराठी माणूस एकत्र आला नाही, तर मेहनतीचा अपमान होईल. ही वेळ गप्प बसण्याची नाही. प्रत्येकाने मोबाईल उचलून, घराघरातून मतदान करत रोहनभाऊ भंजकर यांना विजयी करावे,ङ्क असे आक्रमक शब्दांत त्यांनी स्पष्ट केले.रोहनभाऊ भंजकर यांच्या यशामुळे ग्रामीण व गरीब कुटुंबातील तरुणांना नवी दिशा मिळत असून, कष्ट, जिद्द आणि लढाऊ वृत्तीच्या जोरावर कोणतीही लढाई जिंकता येते, हे पुन्हा एकदा सिद्ध होत आहे.



# सुंदराबाई खंडेलवाल टॉवर येथे ध्वजारोहण संपन्न

▪अकोला,दि.३० (प्रतिनिधी)▪

भारतीय प्रजासत्ताकाच्या दिनाच्या वर्धापन दिनानिमित्त अकोला शहराचे मध्यभागी असलेले ऐतिहासिक सुंदरबाई खंडेलवाल टॉवर येथे मनपा मुख्य लेखा परिक्षक बैजनाथ शेळके यांच्या हस्ते ध्वजारोहण संपन्न झाले आहे. यावेळी सहा. आयुक्त राजेश सरप, गजानन घोंगे, कैलास भिरड, श्रीकांत राऊत, पंकज जोगळेकर, राजेश सोनाग्रे, क.अभियंता नरेश कोपेकर यांचेसह ईतर अधिकारी/ कर्मचा-यांची उपस्थिती होती.

# श्री शिवाजी हायस्कूल तेल्हारा हुतात्मा दिन



▪तेल्हारा,दि.३० (प्रतिनिधी)▪

तेल्हारा येथील श्री शिवाजी हायस्कूल तेल्हारा येथे देशाच्या स्वातंत्र्यासाठी बलिदान देणाऱ्या स्वातंत्र सैनिक व अमर हुतात्मे राष्ट्रपुरुष यांची स्फूर्ती प्रेरणा नवयुवक तरूण , विद्यार्थी यांना मिळाली म्हणून आदरपूर्वक हुतात्मा दिनाच्या निमित्ताने मौन धारण करून आदरांजली वाहण्यात आली आहे यावेळी विलास गांवडे मुख्याध्यापक,शांतीकुमार सावरकर, बळीराम कुवारे बी जी पवार तूषार जाधव अंकेश भांबुरकर भारत भोवर,धनंजय भंगाळे, अभिजित हिंगणकर सौ शर्वरी हिंगणकर कु प्रियंका नंदाने श्रीधर लोखंडे,रूपचंद गाढवे,तेजराव कडू विजय दहे शिक्षकेतर कर्मचारी वर्ग विद्यार्थी उपस्थित होते.

# माता चैतन्य मीरांच्या भागवत कथेत गोवर्धन उत्सव

▪अकोला,दि.३० (प्रतिनिधी)▪

सकाळच्या सत्रात कथेचा होणार समारोप अकोलाङ्कश्री गोरक्षण संस्थान, भारतीय संस्कृति प्रचार परिषद आणि श्री भागवत सेवा समितीच्या संयुक्त विद्यमाने गोरक्षण रोडवरील गोरक्षण संस्थानात चालू असलेल्या माता चैतन्य मीरांच्या भागवत कथेत भव्य गोवर्धन उत्सव साजरा करण्यात आला. यात छप्पन भोग, भगवान कृष्ण आणि गोवर्धन पर्वताची सुंदर झांकी साकारली गेली. ही झांकी पाहण्यासाठी कथास्थळी भक्तांची गर्दी उमटली.

या भागवत कथेत माता चैतन्य मीरांनी बालकृष्ण लीला साकार कर वृंदावनाची महिमा प्रतिपादित केली. कथेत मातांनी भागवताची महिमा सांगून कालिया मर्दन, छप्पन भोग दर्शन, गोवर्धननाथ पूजन साकार करीत भक्तीभाव निर्माण केला. या सत्रात मातांनी ब्रह्मदेवाची कथा सांगितली, ब्रह्मणे सृष्टी निर्माण केली पण काशी विश्वनाथ आणि वृंदावनाचे निर्माण त्यांना करता आले नाही. गिरीराज कथा श्रवणाने सर्व मनोकामना पूर्ण होतात. त्याच प्रमाणे भोजन आणि दानाने गिरीराज प्रसन्न होतात. याचे नित्य श्रवणाने सुखप्राप्ती होते, असा उपदेश माता चैतन्य मीरांनी दिला. गोवर्धन झांकी सिद्धार्थ रुहाटिया यांनी आणि यशोदा सीमा रुहाटिया यांनी साकारली. सर्वप्रथम दैनिक यजमान सुरेश खंडेलवाल, डॉ. खंडेलवाल आणि इतरांनी मातांचे पूजन केले. उद्या ३१ जानेवारीला सकाळी ९.३० वाजता कथेचा समारोप होईल. या कथेचा लाभ घ्या, असे आवाहन दीपक भारतीया, श्रीप्रकाश रुहाटिया, महेश खंडेलवाल, राजीव बजाज, सुशील खोवाल, संजय अग्रवाल, शैलेंद्र कागलीवाल, सीए बी.एम. अग्रवाल, शंकर सेठ, किशोर अग्रवाल, पन्नालाल भूटडा, विक्रम गोयनका, संजय तुलशान, गोपाल एस. अग्रवाल, अशोक अग्रवाल, सुरेश खंडेलवाल, सुरेश सुरेखा, प्रकाश बजाज, प्रेमप्रकाश खेमका, शंकरलाल बियाणी, हेमेंद्र अग्रवाल, शिवप्रकाश मंत्री, मनोज अग्रवाल, अरविंद अग्रवाल, रितेश खेतान, शरद चांडक, अशोक धानुका, शिवभगवान भाला, कमलकिशोर वर्मा, हेमेंद्र राजगुरू, मुकेश गुप्ता, निरंजन अग्रवाल, चंद्रकला अग्रवाल, नीता भारतीया, सौ निर्मला बन्सल, श्रीमती शोभादेवी गोयनका, ज्योती बजाज, सोनल वखारिया, सुनिता अग्रवाल, सुनिता राजकुमार, अंजली अग्रवाल, पुष्पादेवी सोनालावाला यांच्यासह श्री गोरक्षण संस्थान, भारतीय संस्कृति प्रचार परिषद अकोला आणि श्री भागवत सेवा समितीच्या सर्व सेवाधार्यांनी केले.



# गुन्हयातील आरोपी यास मुद्देमालासह १२ तासाचे आत मध्यप्रदेश या राज्यातुन अटक

▪अकोला,दि.३० (प्रतिनिधी)▪

पो.स्टे. एमआयडीसी अकोला येथील गुन्हयातील आरोपी यास मुद्देमालासह १२ तासाचे आत मध्यप्रदेश या राज्यातुन अटक सदर गुन्हयातील फिर्यादी नामे दिपक राधेश्याम अजमेरा वय २७ वर्षे रा. उज्जेन, मध्यप्रदेश यांनी दिनांक २८/०१/२०२६ रोजी जबानी रिपोर्ट दिला कि, ते दिनांक २७/०१/२०२६ रोजी इंदोर येथुन रफिक भाई रहीस भाई यांचे मालकीचे लसनाचे एकुण ७३ कट्टे अकोला मार्गे हैद्राबाद येथे घेवुन जात असतांना अकोला येथील शिवर टी पॉईन्ट समोरील भगतसिंग पुलाचे वर त्यांचे बोलोरो पिक अप गाडी क्र. एम पि १३ झेड डि ४३०३ चा टायर फुटल्याने त्यांनी एका अज्ञात व्यक्तीच्या महींद्रा विरो पिकअप गाडी ज्यास नंबर प्लेट नसलेली मधुन लसनाचा माल हैद्राबाद येथे पोहचविण्या करीता सौदा करून त्या पिकअप मध्ये लसनाचे कट्टे चढवित असतांना महींद्रा विरो पिकअप गाडी ज्याला नंबर प्लेट नसलेली चे चालकाने त्यांची महिंद्रा विरो पिकअप गाडी काढुन त्याचे गाडीमध्ये टाकलेले ४२ लसनाचे कट्टे/माल (१६८० किलो प्रती २०० रू. किलो) एकुण किंमत ३,३६,०००/- रू. चा माल घेवुन पळुन गेला अशा रिपोर्ट वरून पो.स्टे.ला दिनांक २९/०१/२०२६ रोजी अप.क्र. ६१ / २०२६ कलम ३०३ (२) बि. एन. एस. प्रमाणे गुन्हा दाखल करून तपासात घेतला.



सदर गुन्हयाचे तपासामध्ये फिर्यादी यांनी आरोपीचा दिलेल्या मोबाईल नंबरच्या तांत्रीक मदतिने आरोपीची माहीती काढुन तो शिवणी, मध्यप्रदेश येथे असल्याची माहीती मिळाल्या वरून शिवणी, मध्यप्रदेश येथे तपास पथक पाठवुन आरोपीचा शोध घेवुन आरोपी नामे मौहम्मद कैफ अब्दुल रउफ हा त्याची महिंद्रा विरो कंपनीची पांढ-या रंगाचे गाडीसह मिळुन आला ज्यामध्ये गुन्हयातील ४२ कट्टे लसुन असलेला माल किंमत ३,३६,०००/- रू. चे मालासह तसेच आरोपीने गुन्हयात वापरलेली गाडीसह मिळुन आल्याने आरोपी कडुन खालील मुद्देमाल जप्त केला.

RNI NO-46973/1986
Mahasagar Akola
Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak. Printed at Arunodaya Press, Cotton Market, Nagpur-440018 and published at Dainik Mahasagar Office, Kamala Square, Durga Chowk, Akola. **Group Editor-in-Chief and Managing Director** - Shrikrishna Tansukhdas Chandak, **Group Editor** - Sandeep Ramrao Kale, **Managing Editor** - Pankaj Shrikrishna Chandak. **Local Editor** Purushottam Madhukarrao Dhole Phone 9881489479 (Responsible for editorial as per PRB act). Head Office Phone 7447735851,9922970023.

आर.एन.आय. नोंदणी क्रमांक ४६९७३/१९८८
महासागर अकोला
**मालक, मुद्रक, प्रकाशक :** श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर, ४४००१८, येथे छापून, दैनिक महासागर कार्यालय, (मिला स्केअर, दुर्गा चौक, अकोला, येथे प्रकाशित केले. **मुख्य संपादक व मॅनेजिंग डायरेक्टर : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, समूह संपादक : संदीप रामराव काळे, प्रबंध संपादक : पंकज श्रीकृष्ण चांडक**
**स्थानिक संपादक : *पुरूषोत्तम मधुकरराव ढोले, फोन : ९८८१४८९४७९*** **(पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी स्थानिक संपादकांची राहील )**

